जा.क्र.उमा-१/शिमा/कोवि/२०/ 11589-98
शिक्षण उपसंचालक कार्यालय,
कोल्हापूर
18 AUG 2020

प्रति,

१.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद कोल्हापूर विभाग
२.अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्यमिक) कोल्हापूर विभाग

विषय - उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविदयालयांची सन २०१८-१९ च्या संचमान्यतेनुसार सन २०२०-२१ ची वेतन देयके स्विकारणेबाबत.

संदर्भ १. मा.आयुक्त ,शिक्षण यांचक पत्र क्र.आका/संचमान्यता/आस्थाब(१२२)/३२०१ दिनांक १०.९.२०१५.

२.या कार्यालयाचे परिपत्रक दिनांक ३१.७.२०१७ व २१.७.२०१८.

३.या कार्यालयाचे पत्र जा.क्र.उमा-१/कोवि/संमा/वेतन/१९/१७२८७-१७३०१ दिनांक ३० जुलै २०१९.

कृपया संदर्भिय उपरोक्त आदेशाचे अवलोकन करावे.

वरील विषयाच्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की, या विभागातील अनुदानित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालये यांच्या सन २०१८-१९ च्या संचमान्यता सदरवेळीच पूर्ण झालेल्या आहेत. सन २०१९-२० मध्ये संचमान्यता झालेल्या नसल्याने सन २०१८-१९ च्या संचमान्यतेप्रमाणे पटसंख्या, कार्यभार , मंजुर पदे याबाबतचे प्राचार्याचे /मुख्याध्यापकांचे हमीपत्र घेऊन सन २०१९-२० मध्ये आपण विभागातील उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालये यांचे वेतन आदा केलेले असेलच.

सन २०२०-२१ मध्येही संचमान्यता अदयाप झालेल्या नसल्याने सन २०१८-१९ च्या संचमान्यतेप्रमाणे व संदर्भ क्रमांक ३ मधील सूचना व खालील सूचना विचारात घेऊन उच्च माध्यमिकशाळा/कनिष्ठ महाविदयालये यांचे सन २०२१-२१ मध्ये वेतन आदा करण्यात यावे.

१.शालार्थ आय डी असल्याशिवाय कोणत्याही कर्मचा-याचे वेतन आदा करण्यात येऊ नये.

२.पटसंख्या, कार्यभार व मंजुर पदे याबाबतचे प्राचार्य/मुख्याध्यापक यांचे हमीपत्र घ्यावे.

३.वाढीव पदांच्या बाबतीत वैयक्तिक मान्यता देण्यात आलेल्या शिक्षणसेवक/सहा.शिक्षक यांना पद मंजुर असलेशिवाय व सदर पदास वेतनाची तरतुद उपलब्ध झालेशिवाय त्यांचे वेतन आदा करण्यात येऊ नये.

४.अर्धवेळ मंजुर पदांच्याबाबत वैयक्तिक मान्यता सन २०२०-२१ चे या कार्यालयाचे आदेश सदर पदाचा अर्धवेळ व घडयाळी तत्वावरील कार्यभार उपलब्ध होत असल्याचे प्राचार्य / मुख्याध्यापकांचे हमीपत्र घेऊन वेतन आदा करण्यात यावे.

(सत्यवान सोनवणे)
शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

Scanned with CamScanner

जा.क्र.उमा-१/शिमा/कोवि/२०/ 11581-88
शिक्षण उपसंचालक कार्यालय,
कोल्हापूर

18 AUG 2020

प्रति,
प्राचार्य / मुख्याध्यापक,
सर्व अनुदानित उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविदयालये कोल्हापूर विभाग.

विषय - शैक्षणिक वर्ष सन २०२०-२१ मध्ये पायाभूत अर्धवेळ पदाचे व घडयाळी तासिकावरील पदांचे वेतन आदा करणेबाबत

संदर्भ १. मा.आयुक्त ,शिक्षण यांचक पत्र क्र.आका/संचमान्यता/ आस्थाब(१२२)/३२०१ दिनांक १०.९.२०१५.
२.या कार्यालयाचे परिपत्रक दिनांक ३१.७.२०१७ व २१.७.२०१८.
३.या कार्यालयाचे पत्र जा.क्र.उमा-१/कोवि/संमा/वेतन/१९/१७२८७-१७३०१ दिनांक ३० जुलै २०१९.
४.या कार्यालाचे पत्र जा.क्र.शिउसं/कोवि/उमा-२/अंकामा/२०१९-२०/२०२०/६९२१-२८ दिनांक ९ एप्रिल २०२०.
५.शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मुंबई यांचे पत्र क्र.संकीर्ण २०१९/(प्र.क्र.१५४ /१६)/टीएनटी-२ दिनांक १८ सप्टेबर २०१९.

कृपया संदर्भिय क्रमांक ४ चे ५ चे अवलोकन करावे.

उपरोक्त संदर्भ क्रमांक ४ व ५ च्या अनुषंगाने कोल्हापूर विभागातील सर्व अनुदानित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालयांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष सन २०२०-२१ या वर्षाच्या संचमान्यता अदयाप न झाल्याने अर्धवेळ व घडयाळी तासिकावरील शिक्षकांचे वेतनाचा प्रश्न निर्माण झालेला होता.

त्यामुळे सन २०१८-१९ या वर्षाच्या झालेल्या संचमान्यतेमधील कार्यभाराप्रमाणे सन २०२०-२१ मध्ये अर्धवेळ व घडयाळी तासिकावरील पदांना कार्यभार उपलब्ध असल्यास अशा मान्यताप्राप्त शिक्षकांच्या बाबतीत प्राचार्य / मुख्याध्यापक यांचे हमीपत्र शिक्षणाधिकारी (माध्यमिक) वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्यमिक) यांना सादर करुन वेतन आदा करण्याची कार्यवाही करण्यात यावी. सन २०१८-१९ च्या संचमान्यतेप्रमाणे कार्यभार अथवा पदे उपलब्ध नसलेस सदर पदावर कार्यरत असणा-या कर्मचा-यांना वेतन आदा करता येणार नाही याची नोंद घ्यावी. अशा कर्मचा-यांचे वेतन आदा झालेस संपूर्ण जाबाबदारी ही प्राचार्य/मुख्याध्यापक यांची राहील.

(सत्यवान सोनवणे)
शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

प्रत - सविनय सादर
१.मा.आयुक्त, शिक्षण , महाराष्ट्र राज्य पुणे १
२.मा.शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय म.रा.पुणे १

प्रत - माहिती व कार्यवाहीसाठी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक) ,वेतन भविष्य निर्वाह निधी पथक माध्यमिक कोल्हापूर विभाग
२/-शैक्षणिक वर्ष सन २०२०-२१ मध्ये संचमान्यता अदयाप झालेली नसल्यामुळे उच्च माध्यमिक शाळा /कनिष्ठ महाविदयालयांच्या प्राचार्य/मुख्याध्यापकांच्याकडून अर्धवेळ व घडयाळी तासिकावरील पदांचा कार्यभार उपलब्ध असल्याचे हमीपत्र घेऊन संबंधित मान्यताप्राप्त अर्धवेळ व घडयाळी तत्वावरील शिक्षकांचे वेतन आदा करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

Scanned with CamScanner